माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ. १० वी ) व उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षेत प्रविष्ट होणाऱ्या राज्य, राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय पातळीवर सहभागी झालेल्या खेळाडू विद्यार्थ्यांना क्रीडा सवलतीचे वाढीव गुण देण्याबाबतची सुधारीत कार्यपध्दतीची अंमलबजावणी....शुध्दीपत्र

**महाराष्ट्र शासन**

**शालेय शिक्षण व क्रिडा विभाग**

**शासन शुध्दीपत्र क्रमांक :- उमाशि - २०१५ / प्र.क्र. २६२ / एसडी-२**

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक :- ०७ मार्च, २०१७

**संदर्भ:-** शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. एसएससी - २०१२/(१५४/१२)/उमाशि- २ दिनांक: २१ एप्रिल, २०१५

**शासन शुध्दीपत्रः-**

संदर्भाधीन शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. उमाशि - २०१५ / प्र.क्र. २६२ / एसडी-२, दि.२१ एप्रिल, २०१५ नुसार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ. १० वी )व उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षेत प्रविष्ट होणाऱ्या राज्य,राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर सहभागी झालेल्या खेळाडू विद्यार्थ्यांना क्रीडा सवलतीचे वाढीव १५ ते २५ गुण देण्याबाबतची सुधारीत कार्यपध्दतीबाबतच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत.सदर शासन निर्णयातील परिशिष्ट 'अ' मधील अ.क्र. २४ मधील (अ), (ब) व (क) मध्ये खालील प्रमाणे तरतूद आहे.

अ) क्रीडा विभागामार्फत आयोजित करण्यात येत असलेल्या शालेय / ग्रामीण / महिला / इतर क्रीडा स्पर्धेत, आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभाग घेतलेल्या, प्राविण्य मिळविलेल्या व राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत प्रथम, द्वितीय व तृतीय प्राविण्य प्राप्त केलेल्या खेळाडू विद्यार्थ्यांला वाढीव २५ गुण देण्यात यावेत.

ब) क्रीडा विभागामार्फत आयोजित करण्यात येत असलेल्या शालेय / ग्रामीण / महिला / इतर राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या व राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत प्रथम, द्वितीय व तृतीय प्राविण्य प्राप्त खेळाडू विद्यार्थ्यांना वाढीव २० गुण देण्यात यावेत.

क) क्रीडा विभागामार्फत आयोजित करण्यात येत असलेल्या शालेय / ग्रामीण / महिला / इतर राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या खेळाडू विद्यार्थ्यांना वाढीव १५ गुण देण्यात यावेत.

**उपरोक्त तरतूदी ऐवजी सदर तरतूदींचे खालील प्रमाणे वाचन करावे.**

अ) आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी झालेल्या / प्राविण्य मिळविलेल्या किंवा राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत प्रथम/ द्वितीय / तृतीय प्राविण्य प्राप्त खेळाडू विद्यार्थ्यांला वाढीव २५ क्रीडा गुण देण्यात यावेत.

ब) राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या किंवा राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत प्रथम/ द्वितीय / तृतीय प्राविण्य प्राप्त खेळाडू विद्यार्थ्यांला वाढीव २० क्रीडा गुण देण्यात यावेत.

क) क्रीडा विभागामार्फत आयोजित करण्यात येत असलेल्या शालेय/ग्रामीण/महिला / इतर राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या खेळाडू विद्यार्थ्यांना वाढीव १५ क्रीडा गुण देण्यात यावेत.

२. सदर शासन शुध्दीपत्र महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेताक २०१७०३०७११४७०३५२२१ असा आहे. हे शुध्दीपत्र डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Suvarna S Kharat

Digitally signed by Suvarna S Kharat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School And Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6a98fe3e5a45c818668168cffd366aced9a44c5960f616a36d403a80e74d0df, cn=Suvarna S Kharat
Date: 2017.03.07 11:49:14 +05'30'

(डॉ. सुवर्णा सि.खरात)
सहसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति:-

१) मा. प्रधान सचिव (शालेय शिक्षण व क्रिडा विभाग), मंत्रालय, मुंबई.
२) मा. मंत्री (शालेय शिक्षण व क्रीडा) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई
३) मा. शिक्षण आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४) क्रीडा संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे
५) शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे.
६) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्य. व उच्च माध्य. शिक्षण मंडळ, पुणे.
७) विभागीय अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागीय शिक्षण मंडळ (सर्व).
८) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
९) सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
१०) सर्व गटशिक्षणाधिकारी
११) सर्व शिक्षण निरीक्षक, मुंबई (पूर्व ,पश्चिम, उत्तर)
१२) सर्व माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक
१३) निवड नस्ती (एसडी - २).

प मां